ePaper

# ‘पीएफआय’च्या आणखी 170 जणांना अटक!



| वर्ष - 6 | अंक - 167 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

नवरात्रौत्सव
आजचा रंग
निळा



www.mahaenews.com | बुधवार | दिनांक 28 सप्टेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## खासदार श्रीरंग बारणेंकडून महापालिका आयुक्तांची ‘शाळा’

# ‘राम-लक्ष्मण’ जोडीला आता “बारणे पॅटर्न”!

## शहरात भाजपा- शिवसेना (शिंदे गट) महायुतीची ताकद वाढली

**।पुणे।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पिंपरी-चिंचवडमधील महाविकास आघाडीच्या गडाला सुरुंग लागला असून, आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ‘राम-लक्ष्मण’ जोडीला आता ‘बारणे पॅटर्न’ ची साथ मिळणार आहे. भाजपा आणि शिवसेना (शिंदे गट) अशी ताकद वाढली असून, प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची डोकेदुखी वाढली आहे.**

मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी पिंपरी-चिंचवड शहरातील प्रलंबित प्रश्नांबाबत महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांची भेट घेतली. प्रलंबित प्रश्नांची माहिती घेतली, त्याबाबत सविस्तर चर्चा केली. तर, महापालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीचीही खासदार बारणे यांनी आयुक्तांकडून सविस्तर माहिती घेतली. त्यामुळे बारणे कमालीचे सक्रीय झाले आहेत. दुसरीकडे, राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अंतर्गत बंडाळी वाढली असून, पिंपरीचे आमदार अण्णा बनसोडे यांनी “एकला चलो रे”ची भूमिका घेतल्याचे पहायला मिळत आहे. याउलट, भाजपाकडे विद्यमान शहराध्यक्ष आमदार महेश लांडगे, ज्येष्ठ नेते व आमदार लक्ष्मण जगताप यांच्यासह शिंदे गटाचे खासदार श्रीरंग बारणे अशी तिहेरी ताकद वाढली आहे. त्यामुळे आगामी महापालिका निवडणुकीत महाविकास आघाडीसह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला तारेवरील कसरत करावी लागणार आहे. पिंपरी-चिंचवड शहरामध्ये पुढील 20 वर्षांत होणारा विकास, लोकसंख्यावाढ आणि वाढत्या नागरिकरणाच्या गरजा लक्षात घेऊन सुधारित विकास आराखडा तयार केला जात आहे. त्या कामाला गती द्यावी. काम वेगात पूर्ण करुन आराखडा मान्यतेसाठी राज्य सरकारकडे पाठवावा, अशी सूचना शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी महापालिका आयुक्तांना केली. तसेच शहरातील राज्य सरकारशी निगडीत असलेल्या प्रलंबित प्रश्नांसदर्भातील प्रस्ताव तातडीने पाठवावेत. त्याबाबत मुख्यमंत्र्यांशी चर्चा करुन ते निकाली काढण्यात येतील, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.



**"ताथवडे येथील पशुसंवर्धन भागाच्या जागेवर काही आरक्षणे आहेत. त्यात रुग्णालय, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाचे आरक्षण आहे. ते ताब्यात घेण्यासाठीचा सुधारित प्रस्ताव महापालिकेकडून राज्य शासनाला पाठवावा. निगडी, प्राधिकरणातील सेक्टर 23 येथे कचरा संकलन केंद्र करण्यास नागरिकांचा तीव्र विरोध आहे. त्यामुळे कचरा संकलन केंद्र तिथे करु नये. ते दुसरीकडे स्थलांतरित करावे. केंद्र स्थलांतरित करण्यास आयुक्तांनी तत्काळ होकार दर्शविला आहे.**

**- श्रीरंग बारणे, खासदार, मावळ.**

### पवना नदीच्या संवर्धनासाठी पुढाकार...

खासदार श्रीरंग बारणे म्हणाले की, "स्मार्ट सिटीचा कालावधी संपुष्टात येत आला आहे. स्मार्ट सिटीच्या कामांचा जनतेला उपयोग झाला पाहिजे. पूर्णात्वाकडे आलेल्या कामांचा आढावा घ्यावा आणि ही कामे जनतेसाठी खुली करावीत. स्मार्ट सिटीतील प्रलंबित कामे तत्काळ मार्गी लावावीत. सायन्स पार्कच्या विस्तारित कामाला गती द्यावी. त्याबाबत येणा-या अडचणींसाठी लवकरच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत बैठक घेण्यात येईल. पवना नदी सुधारच्या कामाला सुरुवात करावी. त्यासाठी कर्जरोखे ( बॉण्ड) घेण्याबाबत राज्य शासनाकडे फाईल आहे. ती मंजूर करुन घेतली जाईल. पवना नदी सुधारचा केजूबाई बंधारा ते मोरया गोसावी पर्यंतच्या पहिल्या टप्प्यातील भागाचे काम तत्काळ चालू करावे".

# पर्यटनामुळे निसर्ग जाणून घेण्याची संधी!

## पर्यावरण प्रेमी धनंजय शेडबाळे : नॉव्हेल्स कॉलेजमध्ये पर्यटन दिन साजरा

**। पिंपरी चिंचवड ।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

“पर्यटन म्हणजे आपण मोजकी प्रेक्षणीय स्थळे आणि मौजमजा अशीच त्याची व्याख्या करतो. प्रत्यक्षात त्यापलिकडे पर्यटनाच्या माध्यमातून आपल्यासाठी निसर्ग जाणून घेण्याची एक चांगली संधी असते”, असे मत सावरकर मंडळ निसर्गमित्र विभागाचे प्रमुख व पर्यावरणप्रेमी धनंजय शेडबाळे यांनी व्यक्त केले.



निगडी येथील नॉव्हेल्स एनआयबीआर कॉलेज ऑफ हॉटेल मॅनेजमेंटमध्ये जागतिक पर्यटन दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या वेळी नॉव्हेल ग्रूफ ऑफ इन्स्टिट्यूट्सचे संस्थापक-अध्यक्ष अमित गोरखे, एनआयबीआर कॉलेज ऑफ हॉटेल मॅनेजमेंटचे प्राचार्य वैभव फंड आदी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांशी संवाद साधताना धनंजय शेडबाळे पुढे म्हणाले की, “पर्यटनाच्या निमित्ताने कोणत्याही ठिकाणी गेल्यानंतर अवती-भवती असलेला निसर्ग डोळसपणे पाहिला व अनुभवला पाहिजे. प्रत्येक पर्यटनस्थळी निसर्गापासून वेगळा आनंद व अनुभूती आपल्याला मिळेल. निसर्ग भरभरून देत असताना अशा ठिकाणी गेल्यानंतर निसर्गाची काळजी घेणेदेखील गरजेचे आहे. पर्यटनस्थळी मानवी संवेदनशीलता आणि जबाबदारीचे भान जोपासले गेले पाहिजे. प्लास्टिक कचरा करण्यापासून आपण दूर राहावे आणि इतरांनाही दूर ठेवण्याचा प्रयत्न करावा”.प्राचार्य वैभव फंड म्हणाले की, “या वर्षीचा जागतिक पर्यावरण दिन रिथिंकींग टूरिझम या संकल्पनेवर साजरा करत आहोत. पर्यटनाला चालना मिळावी, पर्यटनस्थळांचा विकास व्हावा, यासाठी विचार करण्याची आवश्यकता आहे. अलिकडे अनेक पर्यटनस्थळी मयर्दिपेक्षा जास्त पर्यटक येणे, म्हणजेच ओव्हर टूरिझम दिसून येते. या ओव्हर टूरिझममुळे अनेक समस्या उद्भवतात. पर्यटन स्थळे, तेथील वास्तू व निसर्गाला हानी पोहोचते. हे टाळण्यासाठी पर्यटन या संकल्पनेबद्दल रिथिंकींग म्हणजेच पुनर्विचार करणे आवश्यक आहे”.

या निमित्ताने आयोजित प्रदर्शनासाठी विदयार्थ्यांनी ग्रामीण आणि शहरी जीवन, ७ सिस्टर्स ही पुर्वांचल राज्ये , ढेपेवाडा, बाली टेंपल यांच्या प्रतिकृती बनविल्या होत्या. यासह म्युझिकल वर्ल्ड टूर, तसेच “पर्यटन आज, काल आणि उदया” या विषयावर नाट्यछटाही सादर करण्यात आली. प्रा. शंतनू देशपांडे यांनी स्वागत केले.

## शॉर्ट न्यूज

### अतिवृष्टी बाधितांसाठी तीन कोटी १८ लाखांचा निधी प्राप्त

।पुणे। महाईन्यूज ।

चालू वर्षी अतिवृष्टी आणि पुरामुळे शेतीपीक, फळपिकांचे नुकसान झाले आहे. या बाधित शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून पाच कोटी २८ लाख रुपयांच्या निधीची मागणी राज्य शासनाकडे करण्यात आली होती. त्यापैकी तीन कोटी १८ लाख रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे. या निधीचे वाटप सुरू करण्यात आले आहे.पुणे जिल्ह्यात जून ते ऑगस्ट या कालावधीत झालेल्या अतिवृष्टी आणि पुरामुळे ९१९२ शेतकऱ्यांच्या २२४७ हेक्टर क्षेत्रावरील पिके बाधित झाली आहेत. शेतीपिके व बहुवार्षिक पिकांच्या नुकसान भरपाईसाठी तीन कोटी १८ लाख रुपये, शेतजमीन नुकसानीसाठी १५ लाख रुपये, मृत जनावरांसाठी ७४ लाख रुपये, पूर्णतः नष्ट, पडझड, कच्ची-पक्की घरे, झोपड्या आणि गोठ्यांसाठी एक कोटी २० लाख रुपये अशा एकूण पाच कोटी २८ लाख रुपयांच्या निधीची मागणी जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी शासनाकडे केली होती.

# पुणे जिल्ह्यात लवकरच नवीन प्राणी संक्रमण केंद्र मिळणार!

## इला फाऊंडेशन आणि महाराष्ट्र वन विभाग यांचा संयुक्त उपक्रम

।पुणे। महाईन्यूज ।

**आजारी, जखमी आणि सुटका केलेल्या वन्य प्राण्यांना वेळेवर, अत्याधुनिक आरोग्य सेवा पुरविण्याच्या उद्देशाने, एला वस्ती, पिंगोरी, पुरंदर येथे 'विलू सी पूनावाला हॉस्पिटल फॉर वाइल्डलाइफ' नावाच्या नवीन प्राणी संक्रमण केंद्राचे उद्‌घाटन दि. ३० सप्टेंबर रोजी करण्यात येणार आहे. संक्रमण केंद्र हे इला फाऊंडेशन आणि महाराष्ट्र वन विभाग यांचा संयुक्त उपक्रम (JV) आहे आणि त्याला डॉ. सायरस एस पूनावाला, अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, सीरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया (SII) यांनी सहकार्य केले आहे.**




भोरच्या उपविभागीय वन अधिकारी आशा भोंग म्हणाल्या, “भोरमध्ये प्राणी आणि पक्षी गंभीर जखमी झाल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत आणि जवळपास एकही हॉस्पिटल नाही म्हणून या संक्रमण केंद्राची खूप गरज आहे.

कधी-कधी पुरंदर, भोर आणि वेल्हाच्या आसपासच्या भागातून तसेच पुण्याच्या हद्दीतूनही वनविभागाला जखमी चिंकारा आणि इतर वन्य प्राणी आढळतात. काहींना नैसर्गिक दुखापत होते तर काहींना अनेकदा रस्ते अपघातात किंवा भटक्या कुत्र्यांचा पाठलाग केला जातो,” या भागात हायना, चिंकारा, मोर आणि घुबड आहेत.

### मध्यवर्ती निवडणुका लागण्याची शक्यता

लवकरच उदघाटन होणाऱ्या रूग्णालयात, ज्यामध्ये सुमारे 10,000 चौरस फुटांचे पिंजरे आणि अलग ठेवणे समाविष्ट आहे, कोविड -19 उद्रेक होण्यापूर्वीच मंजूर करण्यात आले होते. त्यानंतर, SII च्या उदार सहकार्याने, रुग्णालयाचे बांधकाम पूर्ण झाले. हे अत्याधुनिक निदान आणि वैद्यकीय सेवा आणि रेडिओलॉजी आणि इमेजिंग, पॅथॉलॉजी, परीक्षा, ऑपरेशन थिएटर, नर्सिंग, नसबंदी, स्वयंपाकघर आणि अन्न तयार करणे, अलग ठेवणे पुनर्प्राप्ती आणि उपचार (स्क्विज केज, हस्तांतरण पिंजरे) यासारख्या सुविधा देते. आणि पुनर्वसन आणि पुनर्वसन. रुग्णालयात वन्यजीवांवर उपचार करणारे पात्र पशुवैद्यकीय तज्ज्ञ आहेत. पुढे, झुनोटिक रोगांवर देखरेखीसह संशोधन केले जात आहे.

सायरस पूनावाला म्हणाले, “मला या प्रकल्पाचा भाग होताना आनंद होत आहे कारण आपल्या वन्यजीवांचे आणि विशेषतः पारशी समुदायासाठी अतिशय महत्त्वाचे असलेल्या गिधाडांचे संरक्षण करणे महत्त्वाचे आहे.

या रुग्णालयामुळे आम्ही गिधाडांचे तसेच इतर वन्यजीवांचे प्रजनन आणि बचाव कार्य चालू ठेवू शकू.” नैसर्गिक अधिवासांवर मानवाकडून अतिक्रमण होत असल्याने, मानव-प्राणी संघर्षाच्या घटना वाढत आहेत.

# विद्यार्थ्यांना घेऊन जाणारी शाळेची बस आंबेगाव येथे दरीत कोसळली!

## 4 विद्यार्थी जखमी

।पुणे। महाईन्यूज




पुणे जिल्ह्यातील आंबेगाव येथे खासगी शाळेच्या बसचा दरीत कोसळून अपघात झाल्याची घटना घडली आहे. चालकाचे बसवरील नियंत्रण सुटल्याने बसला हा अपघात झाला आहे. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झालेली नाही. ही घटना पुण्यातील घोडेगाव परिसरात घडली आहे. या बसमध्ये एकूण ४४ विद्यार्थी आणि ३ शिक्षक असल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. ४४ पैकी चार विद्यार्थ्यांना मंचर येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पुण्याच्या आंबेगाव तालुक्यातील मुक्ताई प्रशाला पिंपळघोडे येथील शाळेची बस ४४ विद्यार्थी आणि ३ शिक्षकांना घेऊन गिरवली येथील आयुका दुर्बीण पाहण्यासाठी गेली होती. तेव्हा, एका वळणावर बस चालकाचे नियंत्रण सुटून बस थेट दरीत कोसळली . सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. बसमधील मुले ही किरकोळ जखमी झाली आहेत . त्यांना उपचारासाठी घोडेगाव आणि मंचर येथील शासकीय रुग्णालयात उपचार दाखल करण्यात आले आहे. या घटनेची माहिती मिळताच तातडीने रुग्णवाहिका आणि वैद्यकीय सुविधा अपघातस्थळी दाखल झाल्या होत्या. या अपघातानंतर पालकांमध्ये भीतीचे वातावरण असून पालकांनी घाबरून जाऊ नये असं आवाहन पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आयुष प्रसाद यांनी केले आहे.

# नवरात्रोत्सवासाठी फूल बाजार बहरला

।पुणे। महाईन्यूज ।

नवरात्रोत्सवासाठी फूल बाजार बहरला आहे. पावसामुळे फुलांच्या प्रतवारीवर परिणाम झाला आहे. चांगल्या प्रतीच्या फुलांच्या दरात वाढ झाली आहे.

गणेशोत्सवानंतर नवरात्रोत्सवात फुलांच्या मागणीत वाढ होते. श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील फूल बाजारात फुलांची आवक वाढली आहे.

नवरात्रोत्सवात फुलांना मागणी रविवारपासून (२५ सप्टेंबर) पुणे, सोलापूर, सातारा जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी फुले विक्रीस पाठविण्यास सुरुवात केली. पितृपंधरवड्यात फुलांना मागणी नव्हती. हार विक्रेत्यांनी रविवारी फुलांची खरेदी केली. नवरात्रोत्सवात फुलांना मागणी राहणार आहे. दसऱ्याच्या आधी दोन दिवस झेंडूची आवक सुरू होईल. गतवर्षीच्या तुलनेत यंदा फुलांची लागवड चांगली झाली, असे मार्केट यार्डातील फूल व्यापारी सागर भोसले यांनी सांगितले.

### पावसामुळे फुलांच्या प्रतवारीवर परिणाम



### पावसाचा फुलांना फटका

पावसामुळे फुलांच्या प्रतवारीवर परिणाम झाला आहे. मध्यंतरी पुणे, सोलापूर, सातारा जिल्ह्यात झालेल्या मुसळधार पावसाचा फटका फुलांना बसला आहे. चांगल्या प्रतीच्या सुक्या फुलांना मागणी वाढली असून सुक्या फुलांचे दर गेल्या आठवड्याच्या तुलनेत दुपटीने वाढले. पावसामुळे फुले खराब झाली आहे. पावसाने उघडीप दिली असती तर फुलांचे दर कमी झाले असते. फुलांची आवक चांगली होत आहे. नवरात्रोत्सवात झेंडू, शेवंती, गुलछडी, अष्टर, बिजली या फुलांच्या मागणीत वाढ होते, असे भोसले यांनी नमूद केले.

## शॉर्ट न्यूज

### “पे अॅन्ड पार्क” योजना गुंडाळली! ?

**पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी ।**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने (पीसीएमसी) शहरात २० ठिकाणी ‘पे अँड पार्क’ योजना सुरू केली आहे. मात्र, हे काम परवडत नसल्याचे कारण देत या कामाच्या ठेकेदाराने माघार घेतली आहे. त्यामुळे ही योजना गुंडाळली जाणार असल्याचे दिसत आहे. महापालिकेतर्फे विविध योजना राबविण्यात येत आहेत. “पे अँड पार्क” योजना हा त्याचाच एक भाग आहे. PCMC ची शहरातील 396 ठिकाणी "पे अँड पार्क" सुरू करण्याची योजना आहे. पहिल्या टप्प्यात 80 ठिकाणी “पे अँड पार्क” कार्यान्वित करण्यात येणार आहे. "पे अँड पार्क" साठी आवश्यक असलेल्या लेन रस्त्यावरच धडकल्या. काही ठिकाणी लोखंडी बॅरिकेड्स लावण्यात आले होते. वाहनधारकांना “पे अँड पार्क” ची माहिती देण्यासाठी ठिकठिकाणी फलकही लावण्यात आले आहेत. यासंदर्भात निविदाही मागविण्यात आल्या होत्या. आलेल्या कंत्राटदारांपैकी निर्मला ऑटो केअरला ‘पे अँड पार्क’चे काम देण्यात आले. मात्र, गेल्या सहा महिन्यांचे उत्पन्न आणि कर्मचाऱ्यांवर होणारा खर्च पाहता आर्थिक खर्च परवडत नसल्याने कंपनीने या योजनेतून माघार घेत असल्याचे महापालिकेला कळवले आहे."पे अँड पार्क" ला प्रोत्साहन देण्यासाठी आणि बेशिस्त चालकांना शिस्त लावण्यासाठी, महानगरपालिका आणि वाहतूक पोलिसांनी पोलिसांसाठी टोइंग व्हॅन देखील उपलब्ध करून दिल्या आहेत. महापालिकेने ‘पे अँड पार्क’चे सहा पॅकेज केले. यापैकी एका पॅकेजची जागा बीआरटी रस्त्यावर बिल्डरांनी महापालिकेला दिली होती. उर्वरित पाच पॅकेजेसमध्ये पुणे-मुंबई महामार्गावर असलेल्या नाशिकफाटा ते निगडी, चापेकर चौक, टेल्को रोड, स्पाईन रोड, औंध-रावेत बीआरटी मार्ग, केएसबी चौक-हिंजवडी (बिर्ला हॉस्पिटलजवळील मार्ग) या 20 मार्गांवर “पे अँड पार्क”. ऑटो क्लस्टर – काळेवाडी फाटा) मुंबई रस्त्यावर. मिळालेल्या रकमेपैकी ५० टक्के रक्कम महापालिकेला आणि उर्वरित ५० टक्के रक्कम कंत्राटदाराला देण्याचा निर्णय घेण्यात आला.

# अर्धवट माहितीच्या प्रस्तावांना ‘केराची टोपली’!

## फेर प्रस्ताव सादर करण्याचे आदेश : आयुक्त शेखर सिंह यांचा अधिकाऱ्यांना ‘झटका’





### सह शहर अभियंत्याला सुनावले!

**पिंपरी-चिंचवड शहरात ड्रेनेज लाईनला जोडले नाहीत, असे किती स्वच्छतागृह आहेत. त्याचे पाणी थेट नदीत सोडले जात आहे? याची संख्या आयुक्त सिंह यांनी ड्रेनेज विभागाचे सह शहर अभियंता रामदास तांबे यांना विचारली.**

**तांबे हे संख्या सांगण्याऐवजी गोलगोल उत्तरे देवू लागले. त्यामुळे आयुक्त चिडले. “ तुम्ही गोलगोल उत्तरे देऊ नका”, असे खडेबोल सुनावत योग्य ती माहिती द्यावी. किती ठिकाणी स्वच्छतागृह ड्रेनेजलाईनला जोडू शकतो? किती ठिकाणी जोडू शकत नाही? याची सविस्तर माहिती देण्याचे आदेश आयुक्तांनी त्यांना दिले.**

**पिंपरी । । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

पिंपरी-चिंचवड शहरातील विविध विकास कामांचे स्थायी समिती, सर्वसाधारण सभेच्या मान्यतेसाठी विभागप्रमुखांनी पाठविलेले प्रस्ताव अर्धवट माहितीचे असल्याने आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी फेटाळले आहेत. 8 विषय आयुक्तांनी बाजूला ठेवत सविस्तर माहितीसह फेर सादर करण्याचे आदेश नगरसचिव विभागाला दिले.

प्रशासक शेखर सिंह यांच्या उपस्थितीत आज (मंगळवारी) स्थायी समिती, सर्वसाधारण सभा झाली. मान्यतेसाठी 21 प्रस्ताव ठेवले होते. त्यातील 13 मंजूर केले. तर, सविस्तर माहिती नसलेले 8 प्रस्ताव बाजूला ठेवले आणि फेरसादर करण्याचे आदेश दिले. शहरातील विविध विकास कामांच्या खर्चाचे विषय, धोरणात्मक विषयाला स्थायी समिती, सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक असते. प्रशासकीय राजवट असल्याने स्थायी, सर्वसाधारण सभेचे अधिकार प्रशासकाला दिले आहेत. विभागप्रमुखांकडून प्रस्ताव थोडक्या माहितीत मंजुरीसाठी पाठविले जातात. त्या विषयाच्या निविदेची सविस्तर माहिती दिली जात नाही. त्यामुळे सविस्तर माहितीसह विषय सादर करण्याचे आदेश आयुक्तांनी दिले आहेत.

निविदा कधी प्रसिद्ध केली? निविदा कालावधी किती होता? कमी निविदा आल्यास निविदेला मुदतवाढ दिली का? कितीवेळा मुदतवाढ दिली? निविदा रक्कम किती आहे? किती निविदाधारक आले होते?कितीने बिलो होती?

कोणाचा दर स्वीकारला? कधी स्वीकारला? अशी सविस्तर माहिती विषयपत्रावर असली पाहिजे, अशा सविस्तर माहितीसह प्रस्ताव सादर करण्याचे आदेश त्यांनी दिले.

# पिंपरी-चिंचवड भाजपा निवडणुकीसाठी सज्ज : अमोल थोरात

## जगताप, लांडगे यांच्या नेतृत्त्वात भाजपाचा ‘ शंभर पार’ चा निर्धार, जयंत पाटील यांना प्रत्युत्तर

**पिंपरी। । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पिंपरी-चिंचवडमध्ये भारतीय जनता पार्टीची संघटनात्मक बांधणी मजबूत असून, आमदार लक्ष्मण जगताप आणि शहराध्यक्ष, आमदार महेश लांडगे यांच्या नेतृत्त्वाखाली शहरात पुन्हा भाजपाची सत्ता येईल, असा दावा भाजपाचे संघटन सरचिटणीस अमोल थोरात यांनी केला आहे.**



### शहराची वाटचाल प्रगतीच्या दिशेने

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची सभासद आढावा बैठक सोमवारी झाली. यावेळी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी भाजपा निवडणुकांना घाबरत असून, निवडणूक पुढे ढकण्यासाठी खटाटोप करीत आहे, अशी टीका केली होती. त्याला अमोल थोरात यांनी प्रत्यूत्तर दिले आहे.

अमोल थोरात म्हणाले की, राष्ट्रवादीच्या चुकीच्या कारभाराला कंटाळून पिंपरी-चिंचवडकरांनी २०१७ मध्ये भारतीय जनता पार्टीला बहुमत दिले. गेल्या पाच वर्षांत पक्षाकडून विविध विकासकामे मार्गी लागली आहेत. भाजपाच्या नेतृत्त्वात शहराची वाटचाल प्रगतीच्या दिशेने होत आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची सभासद आढावा बैठक सोमवारी झाली. यावेळी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी भाजपा निवडणुकांना घाबरत असून, निवडणूक पुढे ढकण्यासाठी खटाटोप करीत आहे, अशी टीका केली होती. त्याला अमोल थोरात यांनी प्रत्यूत्तर दिले आहे. अमोल थोरात म्हणाले की, राष्ट्रवादीच्या चुकीच्या कारभाराला कंटाळून पिंपरी-चिंचवडकरांनी २०१७ मध्ये भारतीय जनता पार्टीला बहुमत दिले. गेल्या पाच वर्षांत पक्षाकडून विविध विकासकामे मार्गी लागली आहेत. भाजपाच्या नेतृत्त्वात शहराची वाटचाल प्रगतीच्या दिशेने होत आहे. संघटनात्मक पातळीवर आम्ही चांगली तयारी केली आहे. बुथ यंत्रणा सक्षम केली असून, “शेवटच्या घटकाचा विकास” हे धोरण तळागाळापर्यंत पोहोचवण्यात येत आहे. ज्येष्ठ नेते आमदार लक्ष्मण जगताप आणि विद्यमान शहराध्यक्ष आमदार महेश लांडगे यांच्या नेतृत्त्वाखाली आम्ही सकारात्मक विचारांनी काम करीत आहोत.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपाचा प्रत्येक कार्यकर्ता प्रामाणिकपणे काम करीत आहे. त्यामुळे कोणत्याही क्षणी निवडणुका लागल्या तरी भाजपा निवडणुकीसाठी सज्ज आहे.

गेल्या अडीच वर्षांच्या काळात महाविकास आघाडीतील प्रमुख घटकपक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या नेत्यांनी शहरातील



एकही प्रश्न मार्गी लावला नाही. पिंपरी-चिंचवडला दुय्यम वागणूक देण्यात आली. त्याला पिंपरी-चिंचवडकर निवडणुकीत समर्पक उत्तर देतील, असा दावाही अमोल थोरात यांनी केला आहे.

## संपादकीय »

# परकी चलनाची गंगाजळी खालावतेय

***डॉलरच्या तुलनेत घसरत असलेला रुपया सावरण्यासाठी रिझर्व्ह बँकेने बुधवारी काही उपाययोजना जाहीर केल्या. त्यामध्ये स्वाभाविकच डॉलरचा ओघ वाढविण्यावर भर आहे.***

गेल्या काही दिवसांपासून डॉलरच्या तुलनेत रुपया दररोज नीचांकी पातळी गाठत असून, चालू आर्थिक वर्षात रुपयात ४.१ टक्क्याने घसरण झाली आहे. ही घसरण थांबण्यासाठी केंद्र सरकार कोणती पावले उचलणार याकडे साऱ्यांचे लक्ष होते. रशिया-युक्रेन युद्ध, तेलाच्या किमती आदी आंतरराष्ट्रीय कारणे रुपयाच्या घसरणीमागे असली, तरी देशांतर्गत कारणेही तितकीच महत्त्वाची. परकी गुंतवणूकदार गुंतवणूक काढून घेत असल्याने आणि चालू खात्यातील तूट वाढत असल्याने डॉलरचा ओघ आटला आहे. परिणामी परकी चलनाची गंगाजळी खालावत आहे. सध्या या गंगाजळीत ५९३.३ अब्ज डॉलर असून, गेल्या वर्षीच्या तुलनेत त्यात ५० अब्ज डॉलरची घट आहे. या खेरीज सहाशे अब्ज डॉलर कर्जाच्या एक तृतीयांश रक्कम फेडण्याचा काळ लवकरच सुरू होईल. त्यामुळे डॉलरची आवक वाढणे गरजेचे आहे. चालू खात्यातील तूट चिंताजनक आहे. गेल्या आर्थिक वर्षाच्या चौथ्या तिमाहीत ही तूट १३.४ अब्ज डॉलर होती. एकूण देशांतर्गत उत्पन्नाच्या (जीडीपी) तुलनेत हे प्रमाण दीड टक्का आहे. त्या आधीच्या तिमाहीत हे प्रमाण २.६ टक्के होते. ते कमी करण्यात यश आले खरे; परंतु त्यात समाधान मानण्यासारखी स्थिती नाही. त्याच्या आधीच्या आर्थिक वर्षात ही तूट एक टक्का होती. त्यामुळे ही तूट कमी करावी लागेल; त्यासाठी आयात आणि निर्यात यांमधील समतोल साधणे आणि व्यापारातील तूट भरून काढणे महत्त्वाचे ठरते. या पार्श्वभूमीवर रिझर्व्ह बँकेने केलेल्या उपायांकडे पहावे लागेल.

परकी गुंतवणुकीवरील निर्बंध हटविण्यावर मध्यवर्ती बँकेचा भर दिसतो. विशेषत: व्याजदराचे निर्बंध शिथिल केले आहेत. या उपायानंतर लगेच दुसऱ्या दिवशी रुपया किंचित सावरला हे खरे; परंतु त्याला केवळ हे उपायच कारणीभूत नाहीत. कच्च्या तेलाच्या किमतीत झालेल्या घसरणीचाही हा परिणाम म्हणावा लागेल. रुपयाची घसरण थांबविण्यासाठी मध्यवर्ती बँकेने पाऊल उचलणे आवश्यक होते; ते तसे उचलले गेले हे स्वागतार्हच; परंतु यामुळे रुपयाची घसरण लगेच थांबेल असे नाही. मात्र, घसरणीचा वेग कमी होऊ शकतो. या वर्षाच्या अखेर एक डॉलर ८१ रुपयांपर्यंत जाऊ शकेल, असा अंदाज काही संस्था व्यक्त करीत आहेत. तो खरा ठरो किंवा न ठरो; परंतु रिझर्व्ह बँकेला आणि सरकारला परिस्थिती नियंत्रणाखाली ठेवण्यासाठी उपाय आखावे लागतील. त्या दिशेने प्रयत्न होणे म्हणूनच महत्त्वाचे ठरते. सोन्यावरील आयात शुल्कात सरकारने एक जुलैपासून वाढ केली आहे; ती आता ७.५ टक्क्यांवरून १२.५ टक्क्यांवर गेली आहे. त्यामुळेही रुपया सावरेल असा कयास बांधण्यात आला होता.



## आनंदी सकाळ

### मदतीला धावून जाणं हीच खरी सामाजिक कृतज्ञता...

निरंतर आणि निरपेक्षपणे कोणतीही अपेक्षा न ठेवता काही ना काही देत राहणाऱ्या देवाप्रती कृतज्ञता म्हणजे देवयज्ञ होय. या देवाने जगण्यासाठी आवश्यक असलेले सर्व काही म्हणजे वायू, अग्नी, पाणी, पृथ्वी दिली. या सर्व गोष्टींच्या उपभोगातूनच आपली दिनचर्या सुरू असते. सर्व वस्तूंचे उपभोग घेताना आपण देवाचे आभार मानायला नको का? ज्या आईवडिलांनी जन्म दिला, त्या मातृपितृप्रती आपण कृतज्ञ असायला हवे. त्यांना कृतज्ञता अर्पण करणे म्हणजे काय तर त्यांच्या मनाला कोणत्याही वेदना होणार नाहीत याची काळजी घेणे. त्यांचे नाव होईल असे आचरण, त्यांची सेवा आणि वृद्धापकाळी तसेच अनारोग्यावेळी सोबत राहणे ही खरी मातृपितृ कृतज्ञता. ऋषियज्ञ म्हणजे ज्ञानपरंपरेचा आदर. लौकिक व पारलौकिक विद्या, बुद्धी, कला ज्यांच्याकडून प्राप्त केली, त्याच्याप्रती कृतज्ञ राहणे. त्यांच्या उपदेशाप्रमाणे आचरण हेच त्यांना वंदन करण्यासारखे आहे. भूतयज्ञ म्हणजे पृथ्वीतलावर असणारे सर्व जीवसृष्टी. वृक्ष, पशू, प्राणी, पक्षी, हे सारे आहार पुरवितात.

# पक्षांतरबंदी कायदा'च हवाय कशाला!






'पक्षांतरबंदी कायदा' म्हणून जी घटनादुरुस्ती ओळखली जाते, तिच्या पूर्ण पडझडीनंतर तिचा राडारोडा आपल्या पायांखालून दूरही करता येत नसताना तरी एकाच व्यक्तीची आठवण झाली पाहिजे : मधू लिमये! स्वातंत्र्योत्तर काळातील एक उत्तुंग संसदपटू असलेल्या मधुकर रामचंद्र लिमये यांचे यंदा जन्मशताब्दी वर्ष आहे, स्वातंत्र्यलढ्यात ब्रिटिशांनी आणि गोवामुक्ती लढ्यात पोर्तुगीजांनी तुरुंगात टाकूनही निष्ठा अविचल राहिलेले ते समाजवादी नेते होते आणि बिहारसारख्या राज्यातून निवडून येणाऱ्या लिमये यांनी हिंदी व इंग्रजीखेरीज मराठीतही दर्जेदार लिखाण केले होते, रा. स्व. संघाचे ते खंदे विरोधक होतेच पण 'दुहेरी निष्ठां'च्या प्रश्नावरून मोरारजी देसाईंचे 'जनता सरकार' खाली खेचण्यासही त्यांनी मागेपुढे पाहिले नाही, या साऱ्या औचित्यपूर्ण आठवणी निघतीलच. पण आपण आज इथे मधू लिमये यांना आठवायचे, ते त्यांनी 'पक्षांतरबंदी कायद्या'ला केलेल्या विरोधासाठी!

पक्षांतर म्हणजे अखेर मतदारांची फसवणूक, पक्षांतर म्हणजे पक्षाशीच नव्हे तर ज्या पक्षाचा उमेदवार लोक निवडतात त्या लोकांशीही द्रोह.. अशा सुरातील चर्चा १९६७ मध्ये हरयाणामधील एका आमदाराने (गयालाल हे त्यांचे नाव) दिवसभरात दोन पक्ष बदलल्यानंतर देशात होऊ लागली. मग १९८० मध्ये त्याच राज्यातील मोठे नेते भजनलाल यांनी हरयाणातील तत्कालीन 'जनता दला'च्या सर्वच आमदारांसह काँग्रेसमध्ये प्रवेश केला. फसवणूक, द्रोह वगैरे चर्चा तेव्हा टिपेला पोहोचली असताना कुणीतरी पक्षांतरबंदी कायद्याची शक्कल लढवली. हे सारे, कशावरही 'बंदी' घालण्याचा कायदा आणण्याच्या आपल्या परंपरेला साजेसेच होते. त्यामुळे पक्षांतरावरही बंदी आली. हा कायदाही साधासुधा नव्हे, थेट घटनादुरुस्तीच. राज्यघटनेत '१०वी अनुसूची' या नव्या परिशिष्टाचा समावेश झाला. चोहीकडून कौतुकाचा वर्षाव होऊ लागला..

अशा वेळी विरोधाचा एक सूर खणखणीत होता, तो मधू लिमये यांचा. ते तेव्हा संसद-सदस्य नव्हते, पण त्या वेळच्या (१९८५) एका इंग्रजी दैनिकात 'लॉ अगेन्स्ट डिफेक्शन्स' ही लेखमालाच लिहून लिमये यांनी हा विरोध मांडला. त्यांचे मुद्दे तीन होते, पैकी पहिले दोन संसदीय सहभागाची उदारमतवादी तात्त्विक परंपरा जपणारे; तर पुढला अत्यंत महत्त्वाचा आणि आज अनेकजण मांडत आहेत असा मुद्दा वास्तव जोखणारा आणि व्यवहार्य होता. हे मुद्दे असे : (१) सदस्याची स्वत:ची मते (पक्षापेक्षा निराळी असली तरी) व्यक्त करण्यास आडकाठी असेल.

# घटनेच्या चौकटीला धक्का देण्याचे प्रयत्न

**सरकारकडून जी ट्विटरची खाती बंद करण्याचे आदेश कंपनीला देण्यात आले त्यात भाजपचे समर्थक किती होते? घटनेच्या अनुच्छेद १९ मध्ये अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा सविस्तर उल्लेख आहे.**



अभिव्यक्तिस्वातंत्र्यावर कोणत्या परिस्थितीत बंधने घातली जाऊ शकतात, याचीही सविस्तर माहिती त्यात आहे. भारतीय राज्यघटनेची मूल्ये आणि ती जपणाऱ्या संस्थांवर ज्या सरकारने आरंभापासून घाव घालण्यास सुरुवात केली त्या सरकारकडून वेगळी काही अपेक्षा करणे फोलच! मात्र सरकारने आपल्या सोयीप्रमाणे अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा अर्थ लावण्याचा जो प्रयत्न चालवला आहे त्यावरून हे सरकार नक्कीच भारतीय राज्यघटनेच्या चौकटीत चालणारे नाही, हे स्पष्ट होते. सन्मानीय सरकारने व्यक्तीच्या सार्वभौम स्वातंत्र्याचा पुरस्कार करावा आणि राष्ट्रविघातक किंवा व्यक्तिविघातक कृतींना आळा घालावा, मग ते त्यांच्या बाजूचे असोत किंवा विरोधी बाजूचे.

गांधीजींच्या विचारातील स्वच्छता सोपी होती ती आपण घेतली पण साधनशुचिता आपल्याला झेपणार नाही. विरोधात असताना ट्विटरचा उपयोग केला, पण आता सत्तेत आल्यावर तीच किलबिल टिवटिव वाटू लागली आहे, हे साहजिकच आहे. एकचालकानुवर्तित्व (हुश्श!) किंवा पु. ल. यांच्या सोप्या, मार्मिक शब्दांत 'गप्प बसा' संस्कृती हीच आपली खरी प्रवृत्ती. माझी 'मनकी बात' तुम्ही ऐका. तुमच्या 'बाता' ऐकायला मला वेळ नाही. जगाला उपदेश द्यायला जायचे आहे. असा खाक्या! न्यायालयात जाण्याचे धैर्य हा भूमीचा गुण असेल, पण या भूमीत न्याय मिळवण्यासाठी अनंत काळ धीर धरण्याची तयारी हवी हे कोणीतरी ट्वीट करायला हवे!

'मातोश्रीची दारे सन्मानाने उघडली तर परत जाऊ!' या संजय राठोड यांच्या विधानाबाबतची बातमी (७ जुलै) वाचली. हे संजय राठोड म्हणजे तेच ना, शिवसेनेचे दिग्रस-यवतमाळचे बंजारा समाजाचे प्रतिनिधित्व करणारे आमदार आणि माजी वनमंत्री, ज्यांना पूजा चव्हाण या २२ वर्षीय मुलीच्या आत्महत्याप्रकरणी मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागला होता? त्यांना मातोश्रीकडून नेमक्या कोणत्या प्रकारचा सन्मान अभिप्रेत आहे, याचा उल्लेख नाही. पूजाच्या आत्महत्येसाठी त्यांचा राजीनामा घ्यावा यासाठी भाजपने कसे जिवाचे रान केले होते, याचा विसर भाजप नेत्यांना पडला असेलही, मात्र मतदार अद्याप विसरलेले नाहीत.

## ।। अभंगवाणी ।।



अवगुणांचे हातीं ।
आहे अवघी फजीती ॥१॥
नाहीं पात्रासवें चाड ।
प्रमाण तें फिकें गोड ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### विदर्भातील कापूस बाजारात मंदीचे सावट



।अमरावती महाईन्यूज।

यंदाच्या हंगामातील कापूस बाजारात येण्यास अवकाश असला, तरी जागतिक बाजारातील परिस्थितीमुळे कापसाच्या बाजारात मंदीचे सावट असून त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये निराशेचे वातावरण आहे. गेल्या पाच ते सहा महिन्यांमध्ये देशात तसेच आंतरराष्ट्रीय बाजारात कापसाची टंचाई निर्माण होऊन दर तेजीत आले होते. पण आता देशातील अनेक बाजारांमध्ये नवा कापूस दाखल झाला असून त्याला चांगला दरही मिळाला आहे, मात्र आंतरराष्ट्रीय बाजारात कापसाचे दर काहीसे नरमले आहेत. यंदा भारत, पाकिस्तानात अतिवृष्टीमुळे तर चीनमध्ये कोरड्या दुष्काळामुळे कापसाचे उत्पादन कमी होणार, अशी चर्चा आहे. अमेरिकेतही पावसाचे प्रमाण कमी असल्याने उत्पादन घटणार अशी शक्यता

# पक्षचिन्हाबाबत निर्णय निवडणूक आयोगाच्या कोर्टात!

## पक्षचिन्हाबाबत सुनावणी घेण्यास सर्वोच्च न्यायालयाची परवानगी

।नवी दिल्ली।महाईन्यूज।



‘खरी शिवसेना कोणाची’, या राज्यातील सत्तासंघर्षांमधील अत्यंत महत्त्वाच्या मुद्द्यावर सुनावणी घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी केंद्रीय निवडणूक आयोगाला परवानगी दिली. त्यामुळे शिवसेनेच्या ‘धनुष्यबाण’ या निवडणूक चिन्हाबाबतचा निर्णय घेण्याचा आयोगाचा मार्ग मोकळा झाला. या निर्णयामुळे शिंदे गटाला दिलासा मिळाला आहे. न्यायालयातील प्रलंबित खटल्याचा निकाल लागेपर्यंत निवडणूक आयोगापुढील सुनावणी स्थगित करावी, अशी विनंती शिवसेनेने केली होती. सर्वोच्च न्यायालयाच्या पाच सदस्यांच्या घटनापीठाने मंगळवारी दिवसभर झालेल्या युक्तिवादानंतर ती फेटाळली.

आम्हीच खरी शिवसेना असल्याने ‘धनुष्यबाण’ या शिवसेनेच्या निवडणूक चिन्हावर आमचा हक्क असल्याचा युक्तिवाद शिंदे गटाने केला असून, तशी मागणी करणारा अर्ज केंद्रीय निवडणूक आयोगाकडे दाखल केला आहे. या अर्जावरील निवडणूक आयोगाच्या सुनावणीला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिलेली नव्हती. मात्र, कोणताही ठोस निर्णय न घेण्याचे आदेश न्यायालयाने आयोगाला दिले होते. मंगळवारी झालेल्या सुनावणीमध्ये, आयोगाच्या सुनावणीला स्थगिती देण्याची शिवसेनेची विनंती फेटाळल्याने निवडणूक आयोगापुढील सुनावणीचा मार्ग मोकळा झाला आहे.

केंद्रीय निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार शिंदे गट आणि उद्धव ठाकरे गटाला संबंधित कागदपत्रे सादर करावी लागणार आहेत. यासाठी शिवसेनेने दोन वेळा मुदतवाढ मागितली होती. पण, सर्वोच्च न्यायालयाने सुनावणीसाठी हिरवा कंदील दाखविल्याने आयोग आता शिंदे गटाच्या अर्जावर कधीही सुनावणी घेऊ शकतो.

आयोग शिवसेनेला कागदपत्रे दाखल करण्यासाठी आणखी किती दिवसांची मुदत देतो, यावर पुढील सुनावणी कधी होणार, हे निश्चित होईल.

नोव्हेंबरनंतर महापालिकेच्या निवडणुका घेतल्या जाऊ शकतात, असे संकेत राज्य सरकारने दिले आहेत. मुंबई महापालिकेची निवडणूक तारखा जाहीर होण्याआधी आयोग निर्णय घेईल का, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

### २३ ऑगस्ट रोजी दाखल झालेला अर्ज फेटाळला

शिंदे गटातील आमदारांनी बंडखोरी केल्याने राज्यातील महाविकास आघाडी सरकार कोसळले. त्यानंतर ३० जून रोजी शिंदे गट-भाजप यांच्या युतीचे सरकार स्थापन झाले. पण, नवे सरकार सत्तेवर येण्याआधी विधानसभेच्या उपाध्यक्षांनी शिंदे गटातील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह १६ आमदारांना अपात्र ठरवण्याची नोटीस बजावली होती. त्याविरोधात शिंदे गटाने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतल्याने आमदारांची अपात्रता, उपाध्यक्षांविरोधातील अविश्वास ठराव, शिंदे गटाने बदललेले गटनेते व मुख्य प्रतोद आदी मुद्द्यांसंदर्भातील सहा याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होत आहे. विद्यमान सरन्यायाधीश उदय लळित यांनी न्या. धनंजय चंद्रचूड, न्या. एम. आर. शहा, न्या. कृष्ण मुरारी, न्या. हिमा कोहली व न्या. पी. एस. नरसिंह यांच्या घटनापीठाची स्थापना केल्यानंतर, मंगळवारी घटनापीठाने शिवसेनेच्या वतीने २३ ऑगस्ट रोजी दाखल झालेला अर्ज फेटाळला.

---

### शिंदे सरकारचा मोठा निर्णय

# नवरात्रीत शेवटचे तीन दिवस मध्यरात्रीपर्यंत गरब्याला परवानगी

।मुंबई। ।महाईन्यूज।



करोनामुळे गेल्या दोन वर्षापासून राज्यातील सण-उत्सवांवर निर्बंध लादण्यात आले होते. मात्र, यंदा दहीहंडी आणि गणोशोत्सव धुमधडाक्यात साजरा करण्यात आलं आहे. त्यानंतर आता शिंदे सरकारने आणखी एक निर्णय घेतला आहे. गणेशोत्सवाप्रमाणेच नवरात्रोत्सवात देखील राज्य सरकारने 3 दिवस गरब्याला मध्यरात्रीपर्यंत परवानगी दिली आहे.

नवरात्रोत्सवात रात्री १२ पर्यंत गरबा खेळण्याची परवानगी देण्यात यावी, अशी मागणी आयोजकांनी राज्य सरकारकडे केली होती. त्यानंतर आता तीन दिवस मध्यरात्रीपर्यंत गरबा खेळण्यास राज्यसरकारने परवानगी दिली आहे. 1, 3 आणि 4 ऑक्टोबर रोजी रात्री 12 वाजेपर्यंत गरबा खेळता येईल, असा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केला आहे. दरम्यान, यापूर्वी राज्य सरकारने ३ आणि ४ ऑक्टोबरला १२ वाजेपर्यंत गरबा खेळण्याची परवानगी दिली होती. पण, आता यामध्ये एक दिवसांची वाढ करण्यात आली आहे. १ ऑक्टोंबरला देखील आता आयोजकांनी गरब्याचे आयोजन करण्यात येणार आहे.

# हा शिवसेनेला धक्का का मानावा? निवडणूक आयोग...

### सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावर शिवसेनेची भूमिका!

।नवी दिल्ली।महाईन्यूज।



राज्यातील सत्तासंघर्षावर सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या सुनावणीदरम्यान न्यायालयानं पहिल्या प्रकरणात महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. शिवसेनेच्या निवडणूक चिन्हाबाबत निर्माण झालेल्या वादावर निर्णय घेण्याचा आणि कार्यवाही करण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला आहे किंवा नाही? यासंदर्भात न्यायालयानं आपल्या निर्णयात स्पष्ट आदेश दिले आहेत. निवडणूक आयोग यासंदर्भात पुढील कार्यवाही करू शकतं, त्यांच्या कार्यवाहीवर कोणतीही स्थगिती नाही, असं न्यायालयानं नमूद केलं आहे. मात्र, हा शिवसेनेला धक्का मानता येणार नाही, अशी भूमिका पक्षाकडून मांडण्यात आली आहे.

“हा धक्का का मानावा? निवडणूक आयोग घटनात्कम संस्था आहे. निवडणूक आयोगासमोर हे प्रकरण येणार हे नक्कीच होतं. न्यायालयात आज चांगला युक्तीवाद झाला. त्यावर न्यायालयानं या सर्व गोष्टींचा आढावा घेऊन हा निर्णय दिला आहे. जेव्हा पक्षांमधल्या दोन गटांमध्ये वाद असतो, तेव्हा त्याची शहानिशा करण्याचे आयोगाला अधिकार आहेच. निवडणूक आयोगासमोर बाकीच्या गोष्टींची पूर्तता आम्ही करू”, असं शिवसेना नेते अनिल देसाई यांनी आजची सुनावणी पूर्ण झाल्यानंतर सांगितलं.

# ‘पीएफआय’च्या आणखी १७० जणांना अटक

## महाराष्ट्रासह सात राज्यांत कारवाई

।नवी दिल्ली ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।



नवी दिल्ली, मुंबई, ठाणे, पुणे : पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया (पीएफआय) या संघटनेवर तपास यंत्रणांनी मंगळवारी दुसऱ्या टप्प्यात मोठी कारवाई केली. त्यात महाराष्ट्रासह सात राज्यांत छापे टाकून १७० जणांना अटक करण्यात आली. गेल्या गुरुवारी ‘एनआयए’ने १५ राज्यांत छापे घालून ‘पीएफआय’चे १०६ कार्यकर्ते आणि नेत्यांना अटक केली होती. या कारवाईच्या दुसऱ्या टप्प्यात पोलिसांसह तपास यंत्रणांनी मंगळवारी महाराष्ट्राबरोबरच उत्तर प्रदेश, कर्नाटक, दिल्ली, गुजरात, आसाम आणि मध्य प्रदेश या राज्यांत दिवसभर छापे घातले. राष्ट्रीय तपास संस्थेसह (एनआयए) पोलिसांनी पुणे, नांदेड, औरंगाबाद, नगर, संगमनेर, मिरज, ठाण्यात छापे टाकून ‘पीएफआय’च्या कार्यकर्त्यांची धरपकड केली. ठाणे जिल्ह्यात ‘पीएफआय’च्या सहा कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली. त्यात नवी मुंबई आणि मुंब्र्यातील प्रत्येकी दोन, भिवंडी आणि कल्याणमधील प्रत्येकी एकाचा समावेश आहे. कल्याण आणि भिवंडी येथील दोघांना वैयक्तिक हमीवर सोडून देण्यात आले. पुण्यात कोंढवा पोलिसांनी अब्दुल अजीज बन्सल, माज फैजान शेख, मोहम्मद कैस अन्वर शेख, काशीफ नजीर शेख, दिलावर करीम सय्यद, आयमूल रशीद मोमीन या सहा जणांवर पोलिसांनी कारवाई केली.

### ■ कुठे, किती अटकेत?

**महाराष्ट्र आणि आसाममध्ये प्रत्येकी २५ जणांना अटक करण्यात आली. उत्तर प्रदेशात सर्वाधिक ५७, दिल्लीत ३०, मध्य प्रदेशात २१, गुजरातमध्ये १० जणांना अटक करण्यात आली. कर्नाटकमध्येही काही जणांवर कारवाई करण्यात आली.**

# बांगलादेश नौका दुर्घटनेतील मृतांची संख्या 64, बचावकार्य सुरू!

## 20 भाविक अद्याप बेपत्ता

।पीटीआय ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।



बांगलादेशाच्या उत्तर भागात दोन दिवसांपूर्वी नौका बुडाल्याने मृत्यू झालेल्या हिंदू भाविकांची संख्या ६४ वर गेली आहे. रविवारी दुर्गा पूजा उत्सव सुरू होण्यापूर्वी पुरातन बोडेश्वरी मंदिराकडे हे भाविक एका नौकेतून निघाले होते. मात्र, क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी असल्याने ती उलटली. आता या दुर्घटनेतील मृतांची संख्या ६४ वर पोहोचली. मात्र, अद्यापही २० प्रवासी बेपत्ता आहेत.

ही नौका उत्तर-पश्चिम पंचगढ जिल्ह्यातील कोरोटो नदीत उलटून बुडाली. मंगळवारी सकाळी देबीगंज आणि बोडा उपजिल्ह्यांतील नदीपात्रात आणखी १४ मृतदेह सापडले. त्यानंतर स्थानिक अधिकाऱ्यांनी तिसऱ्या दिवशी बचावकार्य सुरू केले. गेल्या दोन दिवसांत ५० मृतदेह बाहेर काढल्यानंतर, बचाव पथकाने मंगळवारी पुन्हा शोधमोहीम सुरू केली, दिलेल्या वृत्तानुसार पंचगढचे अतिरिक्त उपायुक्त दीपंकर रॉय यांनी सांगितले, की या दुर्घटनेतून वाचलेल्यांचा असा दावा आहे, की या नावेत दीडशेहून अधिक प्रवासी होते. नाव बुडाल्यानंतर काही जण पोहत किनाऱ्यावर परतले. प्रारंभिक तपासात या नावेत क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी असल्याचे निदर्शनास आले आहे. तथापि, या दुर्घटनेमागे इतरही कारणे असू शकतात.

**⏭ पंचगढचे अतिरिक्त उपायुक्त दीपंकर रॉय यांनी सांगितले, की या दुर्घटनेतून वाचलेल्यांचा असा दावा आहे, की या नावेत दीडशेहून अधिक प्रवासी होते. नाव बुडाल्यानंतर काही जण पोहत किनाऱ्यावर परतले. प्रारंभिक तपासात या नावेत क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी असल्याचे निदर्शनास आले आहे. तथापि, या दुर्घटनेमागे इतरही कारणे असू शकतात. पूर्ण तपासांती वास्तव समोर येईल.**

# गांधी कुटुंबांवरील दवाबतंत्र अशोक गेहलोतांना भोवलं!

## काँग्रेस अध्यक्षपदाच्या निवडणुकीतून बाहेर?

।नवी दिल्ली ।महाईन्यूज ।वृत्तसंस्था ।



राजस्थान काँग्रेसमधील मुख्यमंत्रीपदाचा पेच अद्यापही कायम आहे. अशोक गेहलोतांना हटवून काँग्रेस नेते सचिन पायलट यांच्याकडे मुख्यमंत्रीपद देण्यास आमदारांनी विरोध केला आहे. त्यानंतर आता मोठी माहिती समोर आली आहे. अशोक गेहलोत काँग्रेस अध्यक्षपदाच्या निवडणुकीतून बाहेर पडले आहेत. गेहलोत यांनी मुख्यमंत्रीपद सोडण्यास नकार दिल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे. याबाबत एनडीटीव्हीने वृत्त दिलं आहे. मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांनी काँग्रेस अध्यपदाची निवडणूक लढणार असल्याची घोषणा केली. त्यानंतर राजस्थानच्या मुख्यमंत्रीपदासाठी सचिन पायलट यांचं नाव आघाडीवर होते.

**⏭. अशोक गेहलोत काँग्रेस अध्यक्षपदाच्या निवडणुकीतून बाहेर पडले आहेत. गेहलोत यांनी मुख्यमंत्रीपद सोडण्यास नकार दिल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे. याबाबत एनडीटीव्हीने वृत्त दिलं आहे.मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांनी काँग्रेस अध्यपदाची निवडणूक लढणार असल्याची घोषणा केली.**

# मी जनतेच्या मनावर राज्य केलं तर मोदीही मला संपवू शकत नाही!

## पंकजा मुंडेंच्या बीडमधील वक्तव्यानंतर चर्चांना उधाण

।मुंबई ।महाईन्यूज ।



भाजपा नेत्या पंकजा मुंडे मागील काही दिवसांपासून सातत्याने चर्चेत आहेत. कधी विधान परिषदेवर उमेदवारी न मिळाल्याने, तर कधी राज्यातील मंत्रिमंडळात स्थान न मिळाल्याने त्यांच्या नाराजीबाबत तर्कवितर्क लावले गेले. ते सर्व अंदाज भाजपा नेत्यांनी फेटाळले. अशातच आता पंकजा मुंडे यांनी केलेल्या वक्तव्याने पुन्हा एकदा चर्चांना उधाण आलं आहे. “मी जनतेच्या मनावर राज्य केलं, तर मोदीही मला संपवू शकत नाही,” असं वक्तव्य पंकजा मुंडे यांनी बीडमध्ये केलं.

पंकजा मुंडे म्हणाल्या, “आपण आगामी निवडणुका लढताना काही बदल करुयात. ही निवडणूक पारंपारिक पद्धतीने न लढता वेगळ्या विषयावर निवडणूक लढू. जात-पात, पैसा-अडका, प्रभाव यापलिकडे जाऊयात. पंतप्रधान नरेंद्र मोदींना वंशवादाचं राजकारण संपवायचं आहे. मीही वंशवादाचं प्रतिक आहे, पण मला कुणीही संपवू शकत नाही. मी जनतेच्या मनावर राज्य केलं, तर मोदींनीही मला संपवायचं ठरवलं तरी ते मला संपवू शकत नाही.”

**आपणच खरी शिवसेना असल्याचा शिंदे गटाचा दावा असून, निवडणूक आयोगाला यासंबंधी निर्णय घेण्यापासून रोखलं जावं अशी मागणी ठाकरेंच्या वतीने करण्यात आली होती. सर्वोच्च न्यायालयाने शिवसेनेची ही याचिका फेटाळून लावली.**

### “माझं काम संस्कृती जपणं आहे हे मान्य, मात्र…”

**“जयप्रकाश नारायण, अटलबिहारी वाजपेयी, नरेंद्र मोदी यांना हे अपेक्षित नाही. माझं काम संस्कृती जपणं आहे हे मान्य आहे. मात्र, माझं काम देशाला काही तरी देणंही आहे. असाच प्रत्येकाने विचार केला पाहिजे, असं मला वाटतं,” असंही पंकजा मुंडेंनी नमूद केलं.**

### “राजकारण करमणुकीचं साधन व्हायला लागलं आहे”

**“आपल्याला राजकारणात स्वच्छता आणायची आहे. त्यासाठी आपल्याला राजकारणात बदल करावे लागतील. त्यासाठी प्रत्येकाच्या घरी पैसे छापण्याचं मशीन नाही की, पैसे छापा आणि राजकारणावर खर्च करा. सध्या राजकारण करमणुकीचं साधन व्हायला लागलं आहे. गणेशमंडळ करा, नवरात्री, दांडीया करा, गरबा करा, नाटक बोलवा, तमाशा बोलवा. अरे काय चाललं आहे हे? हे आमचं काम नाही,” असं मत पंकजा मुंडेंनी व्यक्त केलं.**

# ज्येष्ठ अभिनेत्री आशा पारेख यांना दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर!

ज्येष्ठ अभिनेत्री आशा पारेख यांना 2022 सालचा दादासाहेब फाळके पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे, अशी माहिती केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांनी दिली आहे. यापूर्वी त्यांना भारत सरकारकडून पद्मश्री पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले आहे. 60-70 च्या दशकात आशा पारेख या केवळ चित्रपटांमुळेच नाही तर त्यांच्या मानधनामुळेही चर्चेत असायच्या. तेव्हाच्या काळात आशा सर्वाधिक मानधन घेणाऱ्या अभिनेत्रींपैकी एक होत्या. वयाच्या 16 व्या वर्षी त्यांनी अभिनेत्री म्हणून चित्रपटसृष्टीत काम करण्यास सुरुवात केली.

ज्येष्ठ अभिनेत्री आशा पारेख (ASHA PAREKH) या अभिनय क्षेत्रात सक्रिय नसल्या तरी त्यांचा व्यवसायाचा व्याप मोठा आहे.अधून-मधून त्या टी.व्ही कार्यक्रमात परिक्षक किंवा गेस्ट म्हणून हजेरी लावताना दिसतात. आपल्या कामात अशा पद्धतीन त्या बिझी असल्या तरी त्यांचं सोशल मीडियाच्या कुठल्याच प्लॅटफॉर्मवर एकही अधिकृत अकाऊंट नाही. त्यांना सोशल मीडिया प्लॅटफॉर्म आवडत नाही आणि वयाच्या ७९ व्या वर्षी सोशल मीडिया(SOCIAL MEDIA) जॉइन करुन त्रास होईल असे कुठलेच नवीन प्रयोग आपल्याला करायचे नाहीत असे मत त्यांनी काही दिवसांपूर्वी व्यक्त केले होते.

सोशल मीडियाचा अतिरेक आपल्याला आवडत नाही असेही त्या म्हणाल्या होत्या. आशा पारेख त्यांच्या 'तिसरी मंझिल','दिल देके देखो','कटी पतंग','प्यार का मौसम','मेरा गाव मेरा देश','कारवॉं' अशा अनेक एकापेक्षा एक दर्जेदार सिनेमांमुळे ओळखल्या जातात. त्यांनी राजेश खन्ना,शम्मी कपूर,जितेंद्र,धर्मेंद्र,अनिताभ बच्चन अशा अनेक बड्या स्टार्ससोबत काम केलं आहे.

तसंच केवळ हिंदी नाही तर गुजराती,पंजाबी,कन्नड सिनेमांतूनही त्यांनी अभिनय केला आहे. आशा पारेख त्यांच्या 'तिसरी मंझिल','दिल देके देखो','कटी पतंग','प्यार का मौसम','मेरा गाव मेरा देश','कारवॉं' अशा अनेक एकापेक्षा एक दर्जेदार सिनेमांमुळे ओळखल्या जातात. त्यांनी राजेश खन्ना,शम्मी कपूर,जितेंद्र,धर्मेंद्र,अनिताभ बच्चन अशा अनेक बड्या स्टार्ससोबत काम केलं आहे. तसंच केवळ हिंदी नाही तर गुजराती,पंजाबी,कन्नड सिनेमांतूनही त्यांनी अभिनय केला आहे.



# कृत्रिम पायाच्या जोरावर निर्माण केली वेगळी ओळख



'इच्छा जर शक्तिशाली असेल तर अवघड रस्ता पण पार करू शकतो' अशी म्हण आहे. याचे उत्तम उदाहरण आहे सुधा चंद्रन. सुधा चंद्रन या टीव्ही व हिंदी चित्रपटसृष्टीतील एक प्रसिद्ध नाव आहे. चला तर मग जाणून घेऊया सुधा चंद्रन यांच्या ५७ व्या वाढदिवसानिमित्त काही माहिती...टीव्ही शो सास-बहूमध्ये खलनायकाचे पात्र पडद्यावर दिसते तेव्हा पहिले नाव सुधा चंद्रन यांचे आठवते. सुधा चंद्रन नकारात्मक पात्रांसाठी ओळखली जाते. त्या टीव्ही शो शिवाय हिंदी चित्रपटांमध्येही दिसली आहे. 'कही किसी रोज' मालिकेतील रमोला सिकंद, 'नागिन' मालिकेतील यामिनीच्या भूमिकेतून प्रेक्षकांमध्ये वेगळी ओळख निर्माण केली आहे. फार कमी लोकांना माहिती आहे की सुधा यांनी त्यांच्या जीवनावर आधारित तेलगू चित्रपट 'मयुरी'मधून अभिनय कारकिर्दीची सुरुवात केली. नंतर हा चित्रपट तमिळ, मल्याळममध्ये डब करण्यात आला होता. त्याचा हिंदी रिमेक 'नचे मयुरी' होता. सुधा यांना वयाच्या १७ व्या वर्षी अपघातात पाय कापावा लागला होता. यामुळे त्यांचे डान्सिंग करिअर धोक्यात आले होते. मात्र, तसे झाले नाही. वयाच्या अवघ्या साडेतीन वर्षांपासून सुधा यांनी नृत्य शिकायला सुरुवात केली होती. 'डान्सशिवाय राहू शकत नाही' असे सुधा यांनी सांगितले होते. अपघात झाला तेव्हा आयुष्यभर नाचू शकणार नाही, असे सुधा यांना वाटले होते. परंतु, कृत्रिम पाय आणि फिजिओथेरपीच्या मदतीने त्यांनी नृत्य करायला सुरुवात केली. या बनावट पायामुळे सुधा यांनी सिनेमा आणि नृत्याच्या दुनियेत स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. सुधा ९० च्या दशकापासून टीव्ही इंडस्ट्रीत सक्रिय आहे. त्यांनी आतापर्यंत बहुरानिया, चंद्रकांता, कभी इधर कभी उधर, चश्मे बद्दूर, अंतराल, कसे सांगू, रोज कुठेतरी, कस्तुरी, अदालत सारख्या अनेक टीव्ही शोमध्ये काम केले आहे.

# साऊथ अभिनेत्यासोबत झळकणार मृण्मयी देशपांडे.. येतोय 'बेभान'..

अभिनेत्री मृण्मयी देशपांडे म्हणजे मराठी मनोरंजन विश्वातील एक महत्वाची अभिनेत्री. मृण्मयीने आजवर अनेक मालिका, चित्रपट केले. केवळ अभिनयच नाही तर तिने दिग्दर्शनातही पाय रोवले. लवकरच तिचा 'बेभान' हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. विशेष म्हणजे या चित्रपटात तिच्या जोडीला एक दाक्षिणात्य अभिनेता असणार आहे. नुकतेच या चित्रपटाचे पोस्टर आऊट झाले. मराठी चित्रपाटांच्या दर्जेदार आशयामुळे सर्वांचेच लक्ष मराठी चित्रपटांकडे लागलेले असते. सध्या बॉलीवुड प्रमाणे अनेक अमराठी निर्माते आणि कलाकार मराठी चित्रपटांकडे वळत आहेत. अशीच एक कलाकार मराठी चित्रपटातून आपले नशीब आजमावणार आहे. अनेक दाक्षिणात्य



सिनेमांमधून झळकलेला अभिनेता अनुपसिंग ठाकूर मराठी चित्रपटसृष्टीत पदार्पण करत आहे. अभिनयासोबतच बॉडीबिल्डिंग स्पर्धांमधून देखील त्याने आपले नाव कमवले आहे. शशिकांत पवार प्रॉडक्शन प्रस्तुत अनुप जगदाळे दिग्दर्शित 'बेभान' या आगामी चित्रपटातून मिस्टर वर्ल्ड अनुपसिंग ठाकूर मराठी सिनेसृष्टीत पदार्पण करणार आहे. या चित्रपटाचे पोस्टर नुकतेच सोशल मीडियावर लॉंच करण्यात आले. मधुकर (अण्णा) उद्धव देशपांडे आणि शशिकांत शीला भाऊसाहेब पवार यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे. 'झाला बोभाटा', 'भिरकीट' असे उत्तम चित्रपट केल्यानंतर 'बेभान' हा वेगळ्या धाटणीचा चित्रपट दिग्दर्शक अनुप जगदाळे आपल्यासाठी घेऊन येण्यास सज्ज झाले आहेत. अनुप जगदाळे दिग्दर्शित आगामी 'रावरंभा' या ऐतिहासिक चित्रपटाची चर्चा सुद्धा मनोरंजन क्षेत्रात कमालीची आहे.



# क्रांती झाली निर्माती

निरनिराळ्या आशयावर प्रयोग करणारे 'प्लॅनेट मराठी' पुन्हा एकदा एक नवीन संकल्पना घेऊन प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी सज्ज झाले आहे. लवकरच 'प्लॅनेट मराठी' आणि क्रांती रेडकर यांची निर्मिती संस्था 'दंट हॅप्पी गर्ल' एक नवीन कल्पना घेऊन प्रेक्षकांच्या भेटीला येणार असून या शोच्या निमित्ताने क्रांती रेडकर निर्मिती क्षेत्रात पदार्पण करत आहेत.

वर्षपूर्तीनिमित्त मनोरंजक वेबफिल्म, वेबसिरीजच्या घोषणा होत असतानाच प्लॅनेट मराठीने आणखी एक मोठी घोषणा केली आहे, ती म्हणजे रिॲलिटी शोची. मराठी ओटीटीवर अशा प्रकारचा प्रयोग प्रथमच होत आहे. या शोची रूपरेखा नेमकी काय असणार, यासाठी मात्र थोडी वाट पाहावी लागणार आहे. 'प्लॅनेट मराठी', अ व्हिस्टास कॅपिटल कंपनी नेहमीच त्यांच्या प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी वैविध्यपूर्ण आशय घेऊन आले आहे, त्यामुळे हा रिॲलिटी शोही प्रेक्षकांच्या नक्कीच पसंतीस उतरेल.

शॉर्ट न्यूज »

## संजू सॅमसनचे अर्धशतक!



**। लंडन । महाईन्यूज**

भारत अ विरुद्ध न्यूझीलंड अ यांच्यात मालिकेतील शेवटचा आणि तिसरा एकदिवसीय सामना सुरू आहे. एमए चिदंबरम स्टेडियम, चेन्नई येथे खेळल्या जाणाऱ्या या एकदिवसीय सामन्यात भारताचे नेतृत्व संजू सॅमसन करत आहे. या सामन्यात त्याने कर्णधारपदाला साजेशी खेळी केली आहे. भारताने या सामन्यात ४९.३ षटकात सर्वबाद २८४ धावासंख्या उभारली आहे.

तत्पूर्वी, भारताने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. सलामीवीर अभिमन्यू इश्वरण आणि राहुल त्रिपाठी यांनी संघाला चांगली सुरूवात करून दिली. अभिमन्यू इश्वरण व राहुल त्रिपाठी यांनी पहिल्या गड्यासाठी ५५ धावा जोडल्या. राहुल २५ चेंडूंत १८ धावा करून माघारी परतला.

# नेशन्स लीगच्या उपांत्य फेरीत क्रोएशिया-नेदरलँड्स

## फ्रान्सचा डेन्मार्ककडून 0-2 असा पराभव

**।हैदराबाद । महाईन्यूज ।**



कतारमध्ये २० नोव्हेंबरपासून सुरूक्रोएशिया आणि नेदरलँड्सने रविवारी त्यांचा नेशन्स लीगचा शेवटचा सामना जिंकून पुढील वर्षीच्या उपांत्य फेरीसाठी पात्र ठरले. क्रोएशियाने ऑस्ट्रियाला ३-१ ने पराभूत करून अ-१ गटात अव्वल स्थान पटकावले. नेदरलँड्सने बेल्जियमचा १-० ने पराभव केला आणि १६ गुणांसह अ-४ गटात अव्वल स्थान पटकावले. त्याचवेळी नेशन्स लीगमधील महत्त्वाचा आणि गतविजेता संघ फ्रान्सचा डेन्मार्ककडून ०-२ असा पराभव झाला. मात्र, ऑस्ट्रियाच्या पराभवामुळे फ्रान्स संघ लीगमधून बाहेर जाण्यापासून वाचला, तर ऑस्ट्रियाचा संघ दुसऱ्या श्रेणीत पोहोचला.

कतारमध्ये २० नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या विश्वचषक स्पर्धेतील सहभागी संघांसाठी हा शेवटचा सामना होता. विश्वचषकामध्ये नेदरलँडचा संघ इक्वेडोर आणि सेनेगलच्या गटात आहे. फ्रान्स आणि डेन्मार्क पुन्हा कतारमध्ये भेटतील, त्यांच्या गटात ट्युनिशिया आणि ऑस्ट्रेलिया देखील समाविष्ट आहेत. मॉड्रिचने क्रोएशियाला चांगली सुरुवात करून दिली

क्रोएशियाचा ३७ वर्षीय मिडफिल्डर लुका मॉड्रिकसाठी विश्वचषक ही शेवटची आंतरराष्ट्रीय स्पर्धा असू शकते. तो चांगल्या फॉर्ममध्ये आहे.

### उत्तरार्धात एमबाप्पेचे प्रयत्न अपयशी ठरले

डेन्मार्कने क्रोएशियापेक्षा एक गुण कमी घेत १२ गुणांसह गटात दुसरे स्थान मिळवले, ज्यात त्यांनी घरच्या मैदानावर फ्रान्सला २-० ने पराभूत केले. डेन्मार्कच्या विजयात स्ट्रायकर कॅस्पर डॉल्बर्गने ३३ व्या मिनिटाला आणि मिडफिल्डर अँड्रियास स्कोव्ह ओस्लेनने ३९व्या मिनिटाला गोल करत फ्रान्सला २-० अशी निर्णायक आघाडी मिळवून दिली. स्टार स्ट्रायकर किलियन एमबाप्पेने दुसऱ्या हाफमध्ये फ्रान्ससाठी गोल करण्याचा प्रयत्न केला पण चेंडू गोलपोस्टपर्यंत जाऊ शकला नाही. फ्रान्सच्या संघाला गटात केवळ एक सामना जिंकता आला आणि पाच गुणांसह तिसरे स्थान पटकावले. सहा सामन्यांत फ्रान्सने पाच गोल केले, तर सात गोल अंगावर घेतले.

# प्रो कबड्डी लीग नवव्या हंगामाच्या तारखा जाहीर!

## पुण्यातसह इतर 2 शहरांमध्ये महासंग्राम रंगणार



**। चेन्नई । महाईन्यूज ।**

विवो प्रो कबड्डी लीग २०२२ च्या आयोजकांनी नवव्या हंगामाच्या तारखा जाहीर केल्या आहेत. या वेळी लीग ७ ऑक्टोबर २०२२ पासून सुरू होईल आणि डिसेंबरच्या मध्यापर्यंत चालेल. लीग टप्पा बेंगळुरू, पुणे आणि हैदराबाद येथे आयोजित केला जाईल. विवो पीकेएल हंगाम ९ च्या घोषणेनंतर, लीग कमिशनर अनुपम गोस्वामी यांच्या हस्ते मशाल स्पोर्ट्स पेटवून या लीगचे उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी ते म्हणाले, “कबड्डी या स्वदेशी खेळाला समकालीन इतर खेळांबरोबर आणि क्रीडा चाहत्यांच्या भावी पिढ्यांपर्यंत पोहचवण्यासाठी हा उपक्रम आपण दरवर्षी करत असतो. कबड्डी हा खेळ जगासमोर नेण्याच्या दृष्टीकोनातून विवो प्रो कबड्डी लीगचा प्रवास सुरू केला आहे.”

आयोजकांनी सांगितले की आगामी हंगामात प्रेक्षक परत येतील, कारण हंगाम ८ जवळजवळ संपूर्णपणे प्रेक्षकांविना आयोजित करण्यात आला होता. अनुपम गोस्वामी म्हणाले, “आम्ही आगामी पीकेएल हंगाम ९ बद्दल अधिक उत्सुक आहोत कारण आमचे चाहते बेंगळुरू, पुणे आणि हैदराबाद येथील स्टेडियममध्ये त्यांच्या आवडत्या संघ आणि स्टार्सच्या थरारक खेळीचा अनुभव घेण्यासाठी परततील.” बंगळुरू येथील श्री कांतिवीरा इंडोर स्टेडियम येथे ७ ऑक्टोबरपासून पहिले सत्र सुरु होणार असून पुण्यातील बालेवाडी येथे शिवछत्रपती क्रीडा संकुलात (बॅडमिंटन हॉल) २८ऑक्टोबरपासून स्पर्धेचा उत्तरार्ध पार पडणार आहे.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही